# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

(शिक्षण विभाग)

जा.क्र. 1451 /शि.वि./२०१४ दि. 2/०१/२०१४

**प्रति,**

**सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**

म.न.पा., नागपूर.

**विषय :- "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान" शाळेत राबविण्याबाबत.**

संदर्भ :- अ.शा.पत्र/प्राशिसं/लेक शिकवा अभियान/७०१६, दि.२७.१२.२०१३ चे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, दि. ३ जानेवारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनापासून ते २६ जानेवारी २०१४ या कालावधीत राज्यातील सर्व प्रकारच्या/व्यवस्थापनाच्या शाळांमधून **"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान"** कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे.

करीता उपरोक्त अभियान आपण आपल्या शाळेत सोबत दिलेल्या नियोजन कार्यक्रमाच्या दैनंदिन वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी. या अभियानादरम्यान जिल्हा समिती, विभाग समिती व राज्य समिती आपल्या शाळेला भेट देणार आहेत. त्या दृष्टिने कार्यक्रमाचे योग्यप्रकारे नियोजन करून कार्यक्रमाचा दर्जा उत्तम राहील. याकडे आपण जातीने लक्ष दयावे.

**शिक्षणाधिकारी**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर.**

सत्यमेव जयते



# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले
# 'लेक शिकवा अभियान'

प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

# नियोजित कार्यक्रमाचे दैनंदिन वेळापत्रक



| अ. क्र. | दिनांक | उपक्रम | स्तर, स्थळ व वेळ | सहभागी घटक |
|---|---|---|---|---|
| १. | ३.१.२०१४ शुक्रवार | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियानाचा त्यांची जयंती साजरी करुन प्रारंभ. | सावित्रीबाईंचे जन्मगाव नायगाव जि.सातारा व राज्यभर सर्व शाळांमध्ये | मा. शिक्षणमंत्री मा. आयुक्त शिक्षण, लोकप्रतिनिधी व शिक्षण संचालक प्राथमिक |
| २. | ४.१.२०१४ शनिवार | शाळेतील गरीब, हुशार आणि होतकरु मुलींना लोक-सहभागातून शैक्षणिक साहित्याचे वाटप. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे. | शाळास्तर | शाळा व्यवस्थापन समिती |
| ३. | ६.१.२०१४ सोमवार | शाळेतील कर्तुत्वान माजी विद्यार्थीनींचा सत्कार. शाळेच्या परिपाठात या कार्यक्रमाचे आणि त्यांच्या प्रेरणादायी मुलाखती / मार्गदर्शनांचे आयोजन करावे, दाखलपात्र विद्यार्थ्यी सर्वेक्षण करणे. | शाळास्तर (परिपाठात) | मुख्याध्यापक, शिक्षण, शाळा व्यवस्थापन समिती |
| ४. | ७.१.२०१४ मंगळवार | शाळाबाह्य मुलींच्या गृहभेटी घेणे, शाळेत नियमित उपस्थिती नसनाऱ्या मुलींना शाळेत येण्यास प्रेरणा देणे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे. | शाळा सुरु होणापूर्वी १ तास | शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक शिक्षक |
| ५अ. | ८.१.२०१४ बुधवार | विटभट्टी, ऊसतोड कामगार, दगडखाणी इ. स्थलांतरीत पालकांचे समुपदेशन करुन त्यांच्या मुलींना शाळेत प्रवेश देणे. | शाळा भरण्यापूर्वी २ तास पालकांच्या भेटी घेणे. | शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक शिक्षक |
| ५ब. | ८.१.२०१४ बुधवार | मुलींना पदवीधार होईपर्यंत शिक्षण न सोडण्याची प्रतिज्ञा घेणे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे. | शालेय परिपाठाच्या वेळी | मुख्याध्यापक, शिक्षक व सर्व विद्यार्थीनी |
| ६. | ९.१.२०१४ बुधवार | मुलींच्या शिक्षणासाठी विशेष कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा ( प्रामुख्याने महिला कार्यकर्त्यांचा )सत्कार करणे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे. | शालेय परिपाठाच्या वेळी | मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती |

| अ. क्र. | दिनांक | उपक्रम | स्तर, स्थळ व वेळ | सहभागी घटक |
|---|---|---|---|---|
| ७. | १०.१.२०१४ शुक्रवार | मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषवाक्यांच्या स्पर्धा, काव्य वाचन इ. स्पर्धेतील प्रथम पाच विद्यार्थीनींचा सत्कार. | शालेय परिपाठाच्या वेळी | मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी |
| ८. | ११.१.२०१४ शुक्रवार | पोस्ट ऑफिस, बँका, पतसंस्था इ. भेट – वनभोजन, | दिवसभर | मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी |
| ९. | १३.१.२०१४ सोमवार | मुलींच्या वकृत्व स्पर्धा विषय :– **'मुलींचे शिक्षन समाजाचे रक्षण'** | परिपाठात शाळेपूर्वी २ तास | मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी |
| १०. | १५.१.२०१४ बुधवार | आदर्शमाता पुरस्कार – कठिण आर्थिक परिस्थितीतून आपल्या मुलींना शिक्षण देणाऱ्या वयोवृद्ध आईचा सत्कार करणे. मकर संक्रांती निमित्त मुलींच्या मातांचा हळदी–कुंकवाचा कार्यक्रम (तिळ–गूळ वाटप) आयोजित करणे. मुलींच्या रांगोळी, रंगभरण स्पर्धा आयोजित करणे. | शाळेपूर्वी २ तास | मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी |
| ११. | १६.१.२०१४ गुरुवार | मुलींच्या बुद्धीबळाच्या स्पर्धांचे आयोजन करावे. | सकाळी शाळापूर्वी २ तास | मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी |
| १२. | १७.१.२०१४ शुक्रवार | विद्यार्थी चित्रकला स्पर्धा – 'मुलांपेक्षा मुलगी बरी', 'प्रकाश देईल दोन्ही घरी' व विशेष प्राविण्य मिळविण्याऱ्या मुलींना परिपाठात पुरस्कार देणे. | परिपाठापूर्वी २ तास स्पर्धांचे आयोजन | मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी |
| १३. | १८.१.२०१४ शनिवार | मुलींच्या मैदानी व मर्दानी स्पर्धांचे आयोजन करणे – धावणे, लांब उडी, पुलप्स काढणे, उंच उडी, गोळा / थाळी फेक, बाल आनंद मेळावा, फनी गेम ( उदा. लिंबु चमचा, संगित खुर्ची ) व पुरस्कार समरंभ | शाळासुटण्यापूर्वी २ तास स्पर्धांचे आयोजन | मुख्याध्यापक, शिक्षक |
| १४. | १९.१.२०१४ रविवार | मुलींच्या स्व–रक्षनासाठी ज्युदो कराटे, पोहणे विषयी माहिती सांगुन प्रात्याक्षिक दाखविणे. | शाळास्तर | मुख्याध्यापक, शिक्षक |

| अ. क्र. | दिनांक | उपक्रम | स्तर, स्थळ व वेळ | सहभागी घटक | |
|---|---|---|---|---|---|
| १५. | २०.१.२०१४ सोमवार | मुलींची आराग्य तपासणी :- महिला वैद्यकिय अधिकाऱ्यांमार्फत मोफत तपासणी व मार्गदर्शन करणे. | दिवसभर | वैद्यकिय अधिकारी, मुख्यध्यापक | |
| १६. | २१.१.२०१४ मंगळवार | 'एक दिवस शाळेसाठी' किंवा 'कृती अध्यापन दिन' :- या कार्यक्रमांतर्गत शिक्षण व इतर क्षेत्रातील सर्व अधिकारी व पदाधिकारी जवळच्या शाळेत जाऊन प्रत्यक्ष शिकवतील. | दिवसभर | मुख्याध्यापक व पदाधिकारी | |
| १७. | २२.१.२०१४ बुधवार | कर्तुत्व शालीन महिलांच्या कार्याचे जीवन वृत्तांताचे चित्र प्रदर्शन | शाळास्तरावर दिवसभर | मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती | |
| १८. | २३.१.२०१४ गुरुवार | माता-पालक-शिक्षक संवाद सभा :- शैक्षणिक गुणवत्ता या बाबत मार्गादर्शन | सकाळी ९ ते १० | मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती | |
| १९. | २४.१.२०१४ शुक्रवार | मुलींच्या कथाकथनाचा कार्यक्रम | मध्यांतरानंतर | मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती | |
| २०. | २५.१.२०१४ शनिवार | भारतीय कन्याकोष डि. व्ही. डी. सी. डी. दाखविणे, महिलांची विशेष ग्रामसभा आयोजित करुन शिक्षण, आरोग्य, व्यवसाय कौशल्य यांवर मार्गदर्शन करणे. | सकाळी ७ ते १० | मुख्याध्यापक व शिक्षक | |
| २१. | २६.१.२०१४ रविवार | प्रजासत्ताक दिना निमित्ता - विद्यार्थी - विद्यार्थीनी संचलन, चावडी वाचन कार्यक्रम, लोकगीते, सांस्कृतिक कार्यक्रम ( सावित्रीबाई फुले यांच्याजीवन पटावर आधारित ), चित्र प्रदर्शन हस्तलिखीत तयार करुन प्रकाश करणे. शाळेमध्ये विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे. | सकाळी ध्वजारोहनाच्या- वेळी | लोकप्रतिनिधी मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती. | मुलींमध्ये सभा धिटपणा निर्माण करणे |

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

दूरध्वनी क्र. (०२०) २६१२१३९४
(०२०) २६१२१३९६

फॅक्स नं. (०२०) २६१२५८७४
ई–मेल : depmah@gmail.com

---

**महावीर माने**
**शिक्षण संचालक (प्राथमिक)**

**अ.शा.पत्र/प्राशिसं/लेक शिकवा अभियान/ ७०१६**
**दिनांक २७/१२/२०१३**

**विषयः ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान**
**दि. ३ जानेवारी २०१४ ते २६ जानेवारी २०१४**

**प्रिय श्री**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी राज्यात मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली आणि देशातील एका सामाजिक परिवर्तनाच्या पर्वाचा प्रारंभ झाला. त्यांच्या या कार्याची नोंद देशाच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय असून, या शैक्षणिक क्रांतिकार्याची प्रेरणा सतत मिळावी. या दृष्टीने दिनांक **३ जानेवारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनापासून २६ जानेवारी २०१४ या कालावधीत** राज्यातील सर्व प्रकारच्या/व्यवस्थापनाच्या १,०२,९६६ शाळांमधून **'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान'** कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावित आहे.

अभियानाच्या काळात गावपातळीवर, शाळास्तरावर, शहरी, निमशहरी व ग्रामीण भागात पुढे दर्शविलेल्या प्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन व्हावे असे अपेक्षित आहे.

- माता-शिक्षक-पालक संवाद, चावडी वाचन, आदर्शमाता पुरस्कार, कर्तृत्ववान महिलांच्या कार्याच्या जीवन वृत्तांताचे, चित्रप्रदर्शनाचे, कथाकथन व अनुभवकथन सारखे कार्यक्रम आयोजित करणे.
- मुलींची आरोग्य तपासणी करणे.
- स्थलांतरीत पालकांच्या मुलींना शाळेत दाखल करणे.

- शाळाबाहय मुलां/मुलींच्या गृहभेटी व अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या पदयात्रा.
- मुलींच्या शिक्षणासाठी कार्यरत महिला कार्यकर्त्यांचा शाळेत सत्कार करणे व कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा परिचय परिपाठाच्या वेळी करून देणे, शक्य असल्यास प्रत्यक्ष संवाद घडवून आणणे.
- मुलींसाठी चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, क्रीडास्पर्धा आयोजित करणे, स्वसंरक्षणासाठी ज्युदो-कराटे सारखे तंत्र शिकविणे.
- 'कृती अध्यापन दिन' या उपक्रमांतर्गत शिक्षण व इतर क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी जवळच्या शाळेत जाऊन एक दिवस प्रत्यक्ष शिकवतील.

या सर्व उपक्रमांच्या सनियंत्रणासाठी शिक्षण व प्रशासनाच्या क्षेत्रातील सर्व क्षेत्रीय अधिकारी / पदाधिकारी यांना या रचनात्मक शैक्षणिक चळवळीत सामील करून, राज्याचा गुणवत्ताक्रम सर्वोत्कृष्ट रहावा यासाठी शालेय शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे.

शैक्षणिक परिवर्तनाच्या विशेषतः मुलींच्या शिक्षणाच्या प्रबोधनाचे एक परिवर्तनशील पर्व अभियानाच्या कालात **दिनांक ३ जानेवारी २०१४ (ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती) ते २६ जानेवारी २०१४ (प्रजासत्ताक दिन)** अशा २४ दिवसात राज्यात कार्यान्वीत व्हावे व या उपक्रमाद्वारे पूर्ण शैक्षणिक वर्षभर राज्यातील शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता व शैक्षणिक दर्जामध्ये लक्षणीय प्रगती व्हावी यादृष्टीने या रचनात्मक परिवर्तनाच्या अभियानात सक्रीय सहभाग घेऊन आपल्या अधिनस्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रेरित करुन शिक्षणाचे हे पर्व यशस्वी करण्याची मी आपणास नम्र विनंती करतो. तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त सांगता समारंभास उपस्थित राहून शैक्षणिक चळवळीस हातभार लावावा.

आपला,

**(महावीर माने)**

**प्रति,**

---------------------------
---------------------------
---------------------------